



# पारनेर दर्शन







वर्ष ३ अंक ३१, गुरुवार १९ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# स्थानिकांना रोजगार, दोन टीएमसी पाणी द्या!

## आमदार काशिनाथ दाते यांची विधानसभेत मागणी

**नागपुर : प्रतिनिधी**

**सुपा एमआयडीसीमध्ये परप्रांतीयांना रोजगार देण्यात येत असून स्थानिकांना मात्र डावलले जात असून भविष्यात या एमआयडीसीमध्ये स्थानिकांना रोजगार देण्याची मागणी करतानाच पश्चिमेकडे वाहून जाणारे पाणी आडवून पारनेर तालुक्याचे हक्काचे दोन टीएमसी पाणी देण्याची मागणी आमदार काशिनाथ दाते यांनी बुधवारी विधानसभेत केली.**

राज्यपालांचे अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होत आ. दाते यांनी तालुक्यातील रोजगार, पाणी, वीज आदी प्रश्नांवर सभागृहाचे लक्ष वेधले.

यावेळी बोलताना दाते म्हणाले, राज्यपालांनी सरकारचे अभिनंदन करताना महायुतीच्या सरकारने जे लोकाभिमुख निर्णय घेतले त्या ६२ मुद्यांवर त्यांचे अभिभाषण झाले. औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र राज्य देशात आग्रेसर आहे. देशांतर्गत उत्पादनामध्ये १४ टक्क्यांपेक्षा अधिक महाराष्टाची भर पडलेली आहे. परकिय गुंतवणूकीमध्येही गतवर्षीच्या तुलनेत ९० टक्के इतके प्रमाण आहे. गुंतवणूकीवर बोलत असताना पारनेर-नगर मतदारसंघातील सुपा एमआयडीसी येते. रांजणगांव, चाकण एमआयडीसीनंतर पुण्याच्या जवळ अतिशय मध्यवत ठिकाणी सुपा एमआयडीसी आहे. या एमआयडीसीमध्ये मोठया प्रमाणावर आंतरराष्ट्रीय उद्योग आले असल्याचे दाते म्हणाले.



■ राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होत आ. काशिनाथ दाते यांनी मतदारसंघातील प्रश्नांकडे लक्ष वेधले.

### मनामध्ये वेगळेच समाधान

विधानसभा सभागृहातील माझे पाहिलेच भाषण आहे. काल औचित्याच्या मुद्यावर थोडेसे बोलण्याची संधी मिळाली. आज राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्याची आज संधी मिळाली असून माझ्या मनामध्ये वेगळेच समाधान आहे. आजचे भाषण करण्याची संधी मला ज्यांच्यामुळे मिळाली त्या माझ्या पारनेर-नगर मतदारसंघातील मतदार व जनतेचे मी आभार मानतो. माझे नेते अजितदादा पवार, महायुतीचे सर्वेसर्वा नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस,एकनाथ शिंदे, राधाकृष्ण विखे यांचेही मी आभार मानतो.

आ. काशिनाथ दाते, विधानसभा सदस्य

### अभिवादन करीत भाषणाला सुरूवात

मी माझ्या आई-वडीलांच्या आशिर्वादाने इथपर्यंत पोहचू शकलो. माझ्या वडीलांच्या स्मृतीलाही विनम्र अभिवादन करतो. कोणताही व्यक्ती माता-पिता-गुरूजनांशिवाय घडू शकत नाही. त्यामुळे मी माझ्या गुरूजनांना वंदन करतो. लोकशाहीच्या मंदिराला, सभागृहाला अभिवादन करीत दाते यांनी आपल्या भाषणाला सुरूवात केली.

### रस्ते कामासाठी मोठी संधी

५ हजार ४८० किलोमिटरचे कॉंक्रीटच्या रस्त्यांचा अभिभाषणात उल्लेख आलेला आहे. इतके मोठे रस्ते करणे गरजेचे असताना ग्रामीण भागात पोहचणारे रस्तेही पुर्ण झाले पाहिजेत. पंतप्रधान ग्रामसडक योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये दरवर्षी २५-३० किलोमिटरचा समावेश करता येतो. त्याची व्याप्ती वाढली तर निश्चितपणे एक हजार, पाचशे लोकसंख्येची जी खेडी आहेत, ती चांगल्या रस्त्याने जोडता येतील. माझ्या मतदारसंघात या कामासाठी मोठी संधी असल्याचे दाते यांनी सांगितले.

### दोन टीएमसी पाण्याला मुर्त स्वरूप यावे

वैणगंगा, नळगंगा, पारगंगा, गोदावरी या नद्या जोडण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. पश्चिम घाटावरचे वाहून जाणारे पाणी आडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. माझ्या मतदारसंघाची भौगोलिक स्थिती अशी आहे की अर्धा मतदारसंघ गोदावरी खोऱ्यामध्ये पाणलोट क्षेत्रात आहे तर अर्धा मतदारसंघ कुकडी व मुळा पाणलोट क्षेत्रामध्ये आहे. म्हणून अम्हाला गोदावरी खोऱ्यामध्ये कोणताही प्रकल्प घेता येत नाही. छोटासा बंधाराही नव्याने घेता येत नाही. त्यामुळे नागरीकांची पाण्याची मोठी गैरसोय होते. पश्चिम घाटाचे पाणी वळविल्यानंतर होणाऱ्या पाण्याच्या उपलब्धतेतून आमच्या पठार भागावरील दोन टीएमसी पाण्याचा जो मी गेली पंधरा वर्षे ऐकतो आहे त्याला मुर्त स्वरूप येत नाही, त्यावर कोणतीही कार्यवाही होत नाही. पठार भागासाठी ही कार्यवाही होणे गरजेचे आहे. दुष्काळी भाग असल्याने कुकडी प्रकल्पातून दोन टीएमसी पाणी मिळाले पाहिजे. जलयुक्त शिवार योजना देवेंद्र फडणवीस यांच्या काळात सुरू झाली होती. ही योजनाही भविष्यात सुरू होणे गरजेचे असल्याचे दाते यांनी सांगितले.

### एमआयडीसीतील रोजगार, दहशत

गेल्या काही वर्षात या एमआयडीसीमध्ये स्थानिकांना रोजगार दिला जात नाही. तिथे मोठया प्रमाणावर परप्रांतीय आलेले आहेत. त्यांनाच रोजगार दिला जातो. एक वेगळया प्रकारचे दहशतीचे वातावरण कंपन्यांभोवती निर्माण केले जात असून त्याचा दुष्परीणाम भविष्यात तिथे चांगल्या कंपन्या येणार असतील त्या कंपनीचे प्रशासन विचार केल्याशिवाय राहणार नाही. हे वातावरण सुधारले पाहिजे. एमआयडीसीच्या भागामध्ये शांतता राहिली पाहिजे, जेणेकरून सुपा एमआयडीसीमध्ये नव नविन उद्योग येतील. तिथे पायाभुत सुविधा मोठया प्रमाणावर उपलब्ध आहेत. ज्यांची जमीन एमआयडीसीसाठी संपादीत केली, त्यांना अश्वासीत करण्यात आले होते की, कुटूंबातील एका व्यक्तिला तिथे नोकरी दिली जाईल मात्र तसे होत नसल्याचे दाते यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

### दिवसा वीज मिळावी

नवी वीज जोडणी बंद करण्यात आली आहे. २४ तास वीज तसेच दिवसा वीज देण्याचे मान्य केले असले तरी आमच्या मतदारसंघात आजूनही दिवसा वीज दिली जात नाही. रात्री पीकांना पाणी भरण्यासाठी जाताना बिबटयांचा धोका शेतक-यांना असतो. त्यामुळे दिवसा वीज देण्याबाबत निर्णय व्हावा अशी मागणी दाते यांनी केली.

# उद्योगांना चालना देण्यासाठी जिल्ह्यात जागरूकता कार्यक्रम

## नव उद्योजकांना आर्थिक पाठबळ मिळणार । खा. नीलेश लंके यांनी घेतली मंत्री जतीन राम मांझी यांची भेट

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**नगर जिल्ह्यात उद्योगांना चालना देण्यासाठी तसेच नव उद्योजक घडविण्यासाठी जिल्हयात तालुकानिहाय जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. खासदार नीलेश लंके यांनी सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग मंत्री जतीन राम मांझी यांची बुधवारी भेट घेतल्यानंतर हा कार्यक्रम घेण्याचे मंत्री मांझी यांनी मान्य केले.**

जिल्ह्यात नव्या उद्योगांना चालना, नवउद्योजक घडविण्यासाठी, त्यांना आर्थिक पाठबळ मिळावे या हेतूने खा. नीलेश लंके यांनी मंत्री मांझी यांची भेट घेउन चर्चा केली. नगर जिल्हयात नवे उद्योग उभारणीसाठी मोठी संधी असून सुपा-पारनेर ही औद्योगिक वसाहत झपाटयाने विकसीत होत आहे. या वसाहतीमध्ये अनेक परदेशी कंपन्यांनी आपले उद्योग सुरू केले असून राज्यातील मोठया औद्योगिक वसाहतीकडे या वसाहतीची वाटचाल सुरू आहे. या वसाहतीसह जिल्ह्यातील उद्योजकांना उद्योग सुरू करण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या हेतूने खा. लंके यांनी पुढाकार घेत मंत्री मांझी यांची भेट घेत सविस्तर माहीती दिली. खा. लंके यांनी दिलेल्या माहीतीवर प्रभावीत होत मंत्री मांझी यांनी नगर जिल्हयात जागरूकता कार्यक्रम घेण्यास मान्यता दिली.

नगर जिल्ह्यातील उद्योगाची रूपरेषा ठरविण्यासंदर्भात तसेच सुक्ष्म, लघु, मध्यम मंत्रालयांतर्गत असणा-या योजना लवकरच प्रथम प्रत्येक तालुक्यात व त्यानंतर जिल्ह्याच्या ठिकाणी जागरूकता कार्यक्रम घेण्यात येणार आहे.



■ उद्योगांना चालना देण्यासाठी जिल्हयात जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यासंदर्भात खासदार नीलेश लंके यांनी बुधवारी सुक्ष्म, लघु, मध्यम मंत्री जतीन राम मांझी यांची भेट घेऊन चर्चा केली.

### आर्थिक सहाय्यासाठी मार्गदर्शन

सुक्ष्म, लघु व मध्यम मंत्रालयाअंतर्गत उद्योजक वाढीसाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करण्यात येईल व तात्काळ उदयम आधार रजिष्ट्रेशन असलेल्या उद्योजकांना आर्थिक सहायय देण्याकरीता योग्य ते मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# प्रत्येक तालुक्यात दिव्यांगांसाठी शिबिरे घ्या

## खा. नीलेश लंके यांची मंत्री डॉ. विरेंद्रकुमार यांच्याकडे मागणी

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीने समाजातील दुर्बल घटकांसाठी आयोजित करण्यात येणारी विशेष शिबिरे नगर लोकसभा मतदाररसंघातील प्रत्येक तालुक्यात दिव्यांग बांधवांसाठी आयोजित करण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री डॉ. विरेंद्रकुमार यांच्याकडे निवेदनादवारे केली.**

सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीने समाजातील दुर्बल घटकांसाठी त्यांची कौशल्ये व क्षमता वाढविण्यासाठी तसेच त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करण्यासाठी विविध योजना व कार्यक्रम राबविले जातात.



या योजना तसेच कार्यक्रम मतदारसंघातील प्रत्येक तालुक्यात राबविण्यासाठी अशा शिबिरांचे आयोजन करण्याच्या सुचना सबंधित अधिकाऱ्यांना सुचना देण्याची मागणी खा. लंके यांनी केली.

या मागणीसंदर्भात खा. लंके यांनी मंत्री विरेंद्रकुमार यांची भेट घेत सविस्तर चर्चा केली. मतदारसंघात आपण गेल्या पाच वर्षात आमदार म्हणून काम करताना दिव्यांग बांधवांसाठी राबविलेल्या विविध योजनांची माहीती मंत्री विरेंद्र कुमार यांना दिली. डॉ. विनयकुमार यांनी खा. लंके यांनी दिव्यांगांसाठी केलेल्या कामाचे कौतुक केले. कोरोना संकटात त्यांनी हजारो रूग्णांना दिलेल्या जीवदानाचीही मंत्री विरेंद्रकुमार यांनी दखल घेत हे काम देशवासीयांच्या कायम स्मरणात राहील अशी टिपन्नीही केली.खा. लंके यांनी केलेल्या मागणीवर कार्यवाही करण्याची ग्वाही मंत्री विरेंद्रकुमार यांनी दिली.

# आयकर विवरणपत्र सादर करण्यासाठी सवलत मिळावी

## सेवा संस्था फेडरेशनचे खा. नीलेश लंके यांना निवेदन



**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**आर्थिक वर्ष २०१७-१८ ते २०२३-२४ या कालखंडामधील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे आयकर विवरण पत्र सादर करण्यासाठी सवलत मिळावी तसेच दंडाची रक्कम माफ करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन सांगली जिल्हा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या फेडरेशनच्या वतीने खासदार नीलेश लंके यांना देण्यात आले.**

खा. नीलेश लंके यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, केंद्र सरकारने विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटयांना इन्कम टॅक्स मधून मुक्त केले आहे. त्यामुळे बहुतांशी विकास सोसायटयांनी आयकर रिटर्न भरलेला नाही. दि. २१ जानेवारी २०२३ रोजी सांगली जिल्हयातील आयक अधिकाऱ्यांनी सोसायटीचे करंट व सेव्हींग खात्यावरील आर्थिक उलाढाल पाहून बऱ्याच संस्थांना नोटीस दिल्या आहेत. सदरच्या नोटीसांसंदर्भात अधिकाऱ्यांची भेट घेतली असता

उर्वरीत पान ३ वर

# विधान परिषदेच्या सभापतीपदी राम शिंदेंची निवड निश्चित

## उमेदवारी अर्ज दाखल । गुरुवारी अधिकृत निवड

**नागपूर : प्रतिनिधी**



**मागील २९ महिन्यांपासून रिक्त असलेल्या विधान परिषद सभापती पदी प्रा.राम शिंदे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. महाविकास आघाडीकडून उमेदवार देण्यात आलेला नाही.१९ डिसेंबर रोजी सभापतीपदाची निवडणूक होणार आहे. या निवडणूकीसाठी भाजपचे प्रा.राम शिंदे यांचे नाव महायुतीकडून उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले होते.**

७ जुलै २०२२ रोजी रामराजे निंबाळकर यांचा कार्यकाळ समाप्त झाल्यापासून विधानपरिषदेचे सभापतीपद रिक्त आहे. राज्य मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला असला तरी अद्यापही खातेवाटप झालेले नाही. शिंदेसेनेकडून काही महत्त्वाच्या पदांची मागणी करण्यात आली होती. त्यात विधानपरिषदेच्या सभापतीपदाचा देखील समावेश होता. जर विधानपरिषदेचे एकूण गणित बघितले तर भाजपचे सर्वाधिक सदस्य आहेत. त्यामुळे भाजपने राम शिंदे यांचे नाव लावून धरले. राज्यपालांनी पाठविलेल्या कार्यक्रमानुसार बुधवारी १२ वाजेपर्यंत अर्ज दाखल करणे आवश्यक होते. शिंदे यांनी सकाळी अर्ज दाखल केला. मात्र मविआने उमेदवार न

उर्वरीत पान ३ वर




# चंदेरी

## रश्मिका मंदानाने सांगितला सलमानबरोबरचा 'तो' किस्सा

**दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदाना सध्या तिच्या 'पुष्पा २' चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटातील तिच्या अभिनयाचे प्रेक्षकांकडून कौतुक होत आहे. रश्मिका मंदाना आता बॉलीवूडचा भाईजान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सलमान खानच्या 'सिकंदर' या आगामी चित्रपटातून चाहत्यांच्या भेटीला येणार आहे. तिने या चित्रपटाच्या शूटिंगवेळी सलमान खानबरोबरचा एक किस्सा सांगितला आहे.**

'सिकंदर' चित्रपटाबद्दल तिचा अनुभव आणि यातील शूटिंगवेळीचे काही किस्से रश्मिकाने सांगितले. सलमानचे कौतुक करताना ती म्हणाली, हा अनुभव म्हणजे अगदी एक स्वप्न सत्यात उतरण्यासारखे आहे. सलमान सर अत्यंत चांगली व्यक्ती असून ते अतिशय साधे आणि नम्र स्वभावाचे आहेत. जेव्हा आम्ही शूटिंग करत होतो, तेव्हा माझी तब्येत बिघडली होती. मला बरं वाटत नव्हतं. ज्या क्षणी त्यांना हे माहिती झालं, तेव्हा ते माझ्याजवळ आले आणि माझी विचारपूस केली. तसेच सेटवर सर्व टीमला माझी काळजी घेण्यास सांगितले. शिवाय मला चांगले जेवण आणि गरम पाणी अशा सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यास सांगितले. ते खरोखर आपली काळजी घेतात व आपण किती खास आहोत याची जाणीव करून देतात. ते देशातील सर्वात मोठ्या कलाकारांपैकी एक आहेत, पण तरीही ते फार नम्र स्वभावाचे आणि व्यावहारिक आहेत, असंही रश्मिका म्हणाली. सिकंदर चित्रपटाबद्दल बोलताना ती म्हणाली, की मी या चित्रपटासाठी फार उत्सुक आहे. तसेच माझ्यासाठी हा फार खास चित्रपट असून प्रेक्षक आणि चाहत्यांप्रमाणे मलाही 'सिकंदर' रुपेरी पडद्यावर पाहण्याची उत्सुकता आहे, असे ती म्हणाली.



रश्मिकाच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास, 'डियर कॉम्रेड' या दाक्षिणात्य चित्रपटातून तिने मोठी प्रसिद्धी मिळवली. या चित्रपटानंतर ती नॅशनल क्रश म्हणून ओळखली जाऊ लागली. त्यानंतर बॉलीवूडच्या 'ॲनिमल' चित्रपटातील तिची भूमिकादेखील चाहत्यांना फार आवडली. रश्मिकाच्या 'पुष्पा २' चित्रपटातील अभिनयाचेही चाहत्यांनी भरभरून कौतुक केले आहे. आता तिच्या आगामी 'सिकंदर' चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. रश्मिका सध्या 'छावा', 'कुबेर', 'द गर्लफ्रेंड' या आगामी चित्रपटांच्या कामात व्यस्त आहे.

## राधिका आपटे झाली आई, दाखवली बाळाची झलक !

**मराठमोळी बॉलीवूड अभिनेत्री राधिका आपटे आई झाली आहे. राधिकाने तिच्या बाळाबरोबरचा फोटो शेअर करून चाहत्यांशी ही आनंदाची बातमी शेअर केली आहे. राधिकाने तिच्या बाळाची पहिली झलक दाखवली आहे. राधिकाचं बाळ आता एका आठवड्याचं झालं आहे.**

राधिका आपटे लग्नानंतर १२ वर्षांनी आई झाली आहे. दोन महिन्यापूर्वी तिने गुड न्यूज दिली होती. आता बाळाबरोबरचा फोटो शेअर करत प्रसुतीनंतर ती कामावर परतली आहे. राधिकाने तिला मुलगा झाला की मुलगी याबाबत सांगितलेलं नाही. राधिकाने शेअर केलेल्या फोटोमध्ये ती लॅपटॉपसमोर बसलेली दिसत आहे. तिच्या कुशीत बाळ आहे. तिने दिलेल्या कॅप्शननुसार तिचं बाळ एका आठवड्याचं झालं आहे. एका आठवड्याच्या बाळाच्या जन्मानंतर पहिली वर्क



मीटिंग अशा आशयाचं कॅप्शन देत राधिकाने फोटो पोस्ट केला आहे. राधिका तिचं वैयक्तिक आयुष्य सोशल मीडियापासून दूर ठेवते. राधिकाने तिच्या लग्नाची माहितीही बराच काळ लपवून ठेवली होती. तिने वर्षभर डेट केल्यावर २०१२ मध्ये ब्रिटीश व्हायोलिन वादक आणि लोकप्रिय संगीतकार बेनेडिक्ट टेलरशी लग्नगाठ बांधली होती. आता राधिका व बेनेडिक्ट दोघेही एका गोंडस बाळाचे आई-बाबा झाले आहेत.

## 'मर्दानी 3'ची घोषणा, राणी मुखर्जी पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार!


**बॉलीवूड अभिनेत्री राणी मुखर्जी पुन्हा एकदा वरिष्ठ निरीक्षक शिवानी शिवाजी रॉय या भूमिकेत झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. 'मर्दानी ३' चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. या चित्रपटात प्रेक्षकांना पुन्हा एकदा राणी मुखर्जीचा भारदस्त अभिनय पाहता येणार आहे.**

'मर्दानी २' रिलीजच्या वर्धापन दिनानिमित्त यश राज फिल्म्सने 'मर्दानी ३'ची घोषणा करत एक पोस्टर शेअर केलं आहे. कॅप्शनमध्ये लिहिलं, प्रतीक्षा संपली! 'मर्दानी ३'मध्ये राणी मुखर्जी पुन्हा एकदा शिवानी शिवाजी रॉय या भूमिकेत दिसणार आहे. २०२६ मध्ये चित्रपटगृहांत मात्र नेमकी तारीख अद्याप समोर आलेली नाही. 'मर्दानी ३'चे दिग्दर्शन अभिराज मीनावाला करणार आहे, तर निर्मिती आदित्य चोपडा करणार आहे. अभिनेत्री राणी मुखर्जीने यावर प्रतिक्रिया दिली आहे. तिने म्हटलं, की मला ही घोषणा करताना फार आनंद होत आहे की, आम्ही २०२५ मध्ये 'मर्दानी ३' चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात करत आहोत. पोलिसांच्या वर्दीत अशा भूमिका साकारणे प्रत्येक कलाकारासाठी एक अभिमानाची गोष्ट असते, माझ्यासाठीदेखील ही फार मोठी गर्वाची गोष्ट आहे. आजवर मोठ्या हिमतीने सर्वांचे रक्षण करताना बलिदान दिलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांसाठी ही एक श्रद्धांजली आहे. मागच्या दोन चित्रपटांच्या तुलनेत 'मर्दानी ३' फार खास असणार आहे. आम्ही जेव्हा हा चित्रपट करण्याचे ठरवले तेव्हा आम्ही एका प्रभावी आणि चांगल्या स्क्रिप्टच्या शोधात होतो. ज्याने प्रेक्षकांनादेखील चांगला अनुभव मिळेल. 'मर्दानी' आणि 'मर्दानी २'वर चाहत्यांनी भरभरून प्रेम केलं आहे. त्यामुळे आता 'मर्दानी ३'साठी चाहत्यांच्या फार अपेक्षा आहेत आणि त्यांच्या या अपेक्षा पूर्ण करणे आमचे काम आहे, असंही राणी मुखर्जीने पुढे म्हटलं. २०१४ मध्ये पहिल्यांदा 'मर्दानी' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. प्रदीप सरकारच्या दिग्दर्शनात बनलेला हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर तुफान गाजला. त्यानंतर २०१९ मध्ये गोपी पुथरण दिग्दर्शित 'मर्दानी २' प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटालाही प्रेक्षकांची मोठी पसंती मिळाली होती. दोन्ही चित्रपटांत राणी मुखर्जीच्या अभिनयाचे चाहत्यांनी कौतुक केले होते. त्यामुळे आता 'मर्दानी ३' चित्रपट पाहिल्यावर प्रेक्षक काय प्रतिक्रिया देणार हे पाहण्यासाठी मी उत्सुक आहे, असंही राणी मुखर्जीने म्हटलं आहे.




## श्रद्धा आर्या लग्नानंतर 3 वर्षांनी झाली जुळ्या मुलांची आई

यंदा सना सय्यद, अदिती शर्मा, सोनाली सेहगल अशा अनेक लोकप्रिय अभिनेत्रींनी आपल्या कुटुंबात चिमुकल्या सदस्यांचे स्वागत केले. टीव्हीवरील गाजलेली मालिका 'कुंडली भाग्य'मध्ये प्रीता ही भूमिका साकारून अभिनेत्री श्रद्धा आर्या लोकप्रिय झाली. श्रद्धा नुकतीच आई झाली आहे. तिने जुळ्या बाळांना जन्म दिला. तिला एक मुलगा व एक मुलगी झाले. श्रद्धाने तिच्या बाळाबरोबरचा एक फोटो पहिल्यांदाच इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. श्रद्धाच्या बाळाचा फोटो सोशल मीडियावर चर्चेत आहे.





श्रद्धा लग्नाच्या तीन वर्षांनंतर आई झाली. तिने २९ नोव्हेंबर रोजी जुळ्यांना जन्म दिला. तिने इन्स्टाग्रामवर एक सुंदर व्हिडीओ शेअर करून मुलांच्या जन्माबद्दल माहिती दिली होती. आता तिने पहिल्यांदाच तिच्या एका बाळाबरोबरचा फोटो इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये शेअर केला आहे. फोटोत श्रद्धा तिच्या १० दिवसांच्या बाळाला घेऊन बसलेली दिसत आहे. दरम्यान, अभिनेत्री श्रद्धा आर्याने २०२१ मध्ये नौदल अधिकारी राहुल नागल याच्याशी लग्न केलं. ऑगस्ट महिन्यात त्यांनी ते आई-बाबा होणार असल्याची घोषणा केली होती. या जोडप्याने लग्नानंतर तीन वर्षांनी आपल्या जुळ्या बाळांचं स्वागत केलं.



## 'करिश्मा का करिश्मा' फेम झनक शुक्लाने घेतले सातफेरे

**२००० च्या सुरुवातीला आलेल्या 'करिश्मा का करिश्मा', 'सोनपरी', 'शरारत' या मालिका आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहेत. या सर्व मालिकेतील बालकलाकार सध्या काय करतात याबद्दल प्रेक्षकांना जाणून घ्यायचे असते. याचबद्दलची नवी अपडेट समोर आली आहे. 'करिश्मा का करिश्मा' मधील रोबोट दाखवलेली अभिनेत्री झनक शुक्लाने लग्नगाठ बांधली आहे.**



झनकने तिचा प्रियकर स्वप्नील सूर्यवंशीबरोबर लग्नगाठ बांधली आहे. १२ डिसेंबर २०२४ ला हा विवाह झाला आहे. या जोडप्याच्या लग्नामुळे त्यांच्या आयुष्यातील एका नव्या पर्वाची सुरुवात झाली असून चाहत्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. झनकने लग्नासाठी लाल रंगाची सोनेरी काठ असलेली सुंदर साडी परिधान केली होती, तर तिचा नवरा स्वप्नील सूर्यवंशी पांढऱ्या शेरवानीमध्ये अतिशय देखणा दिसत होता. नवविवाहित जोडप्याच्या पहिल्या फोटोमध्ये ते हातात हात घेऊन आनंदाने प्रेमाचा आणि एकत्रित प्रवासाचा आरंभ करताना दिसत आहेत. एका व्हिडीओ क्लिपमध्ये झनक शुक्लाची आई अभिनेत्री सुप्रिया शुक्ला हिरव्या रंगाची साडी आणि लाल ब्लाउज घालून दिसत आहे. त्या त्यांच्या होणाऱ्या जावयाला गंध लावताना दिसतात. स्वप्नील सूर्यवंशी हा मेकॅनिकल इंजिनीयर असून त्याचे एमबीए सुद्धा पूर्ण झाले आहे. त्याला आरोग्य आणि फिटनेसविषयी प्रचंड आवड आहे. तो अमेरिकन कॉलेज ऑफ स्पोर्ट्स मेडिसिन (ACSM) कडून प्रमाणित वैयक्तिक प्रशिक्षक आहे. तो लोकांना आरोग्यदायी व सक्रिय जीवनशैली अंगीकारण्यासाठी मार्गदर्शन करतो. झनकने याचवर्षी जानेवारीत साखरपुडा केला होता. २६ वर्षांच्या झनकने अनेक चित्रपट आणि मालिकांमध्ये काम केले आहे. तिने 'करिश्मा का करिश्मा' या मालिकेत रोबोटिक गर्ल करिश्माची भूमिका साकारली होती. याशिवाय तिने 'वन नाइट विथ किंग' या हॉलिवूड चित्रपटातही काम केले होते. तिने शाहरुख खानचा 'कल हो ना हो' या चित्रपटात प्रिती झिंटाची धाकटी बहीण जियाची भूमिका केली होती.

## ऋषभ शेट्टी छत्रपती शिवरायांच्या भूमिकेत दिसणार

**कांतारा चित्रपटामुळे संपूर्ण देशातील घराघरात पोहोचलेला कानडी अभिनेता ऋषभ शेट्टी आता आणखी एका बिग बजेट चित्रपटाच्या माध्यमातून रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. संपूर्ण भारताचं आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर आधारीत चित्रपट साकारला जात असून ऋषभ त्यात शिवरायांची भूमिका साकारत आहेत. ऋषभने स्वतःच याबाबतची माहिती दिली आहे. त्याने त्याचा या चित्रपटातील फर्स्ट लूकदेखील सादर केला आहे.**



चित्रपटाच्या पहिल्या पोस्टरसह चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख देखील जाहीर करण्यात आली आहे. २१ जानेवारी २०२७ रोजी हा चित्रपट प्रदर्शित करण्याची योजना निर्मात्यांनी आखली आहे. हा चित्रपट हिंदीसह विविध भाषांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे. संदीप सिंह हे या चित्रपटाचं दिग्दर्शन करणार आहेत. चित्रपटाचं पहिलं पोस्टर सादर करताना ऋषभने त्याच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की आपला सन्मान आणि विशेषाधिकार, भारतातील महान योद्धा व महान राजाची गाथा प्रस्तुत करत आहोत. 'दी प्राइड ऑफ भारत - छत्रपती शिवाजी महाराज' हा केवळ एक चित्रपट नाही. हा एका योद्ध्याच्या सन्मानार्थ केलेला युद्धघोष आहे.

ज्याने अनेक वादळं पायदळी तुडवतं हिंदवी स्वराज्य साकारलं आणि शक्तीशाली मुघल साम्राज्याला आव्हान दिलं. ज्या राजाने आपल्याला मोठा वारसा दिला ही त्याची गोष्ट २७ जानेवारी २०२७ रोजी जगभरात प्रदर्शित केली जाईल. दिग्गज गायिका आशा भोसले यांची नात जनाई भोसले लवकरच मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. ती या ऐतिहासिक चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण करणार आहे. जनाई ही या चित्रपटात ती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पत्नी सईबाई भोसले यांची भूमिका साकारणार आहे. जनाई ही आशा भोसले यांचे पूत्र आनंद भोसले यांची मुलगी आहे. जनाई सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. तिचे इन्स्टाग्रामवर लाखो फॉलोअर्स आहेत. उत्तम गायिका असलेली जनाई आता अभिनय करताना रुपेरी पडद्यावर दिसणार आहे.

## विवेक ओबेरॉय कसा झाला ३४०० कोटींचा मालक?

**विवेक ओबेरॉय बॉलीवूडचा असा एक अभिनेता आहे, ज्याला २२ वर्षांच्या फिल्मी करिअरमध्ये अनेक चढउतारांचा सामना करावा लागला. २००२ मध्ये त्याने मनोरंजनविश्वात पदार्पण केलं होतं. मात्र, चित्रपटसृष्टीत फारसं यश मिळालं नसलं, तरीही आजच्या घडीला विवेक ओबेरॉय कोट्यवधींचा मालक आहे. अभिनेत्यावर एक वेळ अशी आलेली की, त्याला संपूर्ण चित्रपटसृष्टीतून बॉयकॉट केलं होतं. जवळपास १५ महिने कामंही नव्हतं. अशा कठीण परिस्थितीतून मार्ग काढत विवेकने स्वतःचा व्यवसाय सुरू केला.**

बॉलीवूडमधून बहिष्कार टाकल्यावर त्याने हार न मानता स्वतःचा व्यवसाय सुरू केला. त्याच्या बिझनेसमध्ये विवेकला भरघोस यश मिळालं. नुकत्याच मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात अभिनेत्याने बिझनेसबद्दल त्याचं मत मांडलं आहे. देशभरात व्याजावर पैसे देण्याचा व्यवसाय वर्षानुवर्षे सुरू असून, काही लोक बँकांव्यतिरिक्त स्थानिक पातळीवर सुद्धा व्याजावर पैसे देतात. (या कामासाठी लायसन्स किंवा परवान्याची गरज असते, परवान्याशिवाय व्याजावर पैसे देणे बेकायदेशीर असून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून बँका आणि NBFC यांना बँकिंग परवाना दिला जातो.) विवेकने सर्वात आधी सावकारी व्यवसाय शून्य व्याजदर आकारून सुरू केला होता. विवेकने सांगितलं की, यातून त्याला मोठा नफा झाला, कारण त्या कंपनीचं मूल्य आताच्या घडीला सुमारे ३ हजार ४०० कोटींच्या घरात आहे.

### सांगितला बिझनेस प्लॅन

विवेक म्हणतो, की मी शैक्षणिक कर्जावर आधारित स्टार्टअप सुरू केला होता. हा स्टार्टअप खूप मोठा झाला. कालांतराने आम्ही B2B नेटवर्कद्वारे १२ हजार शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांपर्यंत पोहोचलो. पण, त्यानंतर आम्ही ग्राहकांशी स्वतः संपर्क साधून सर्व डेटा आमच्याकडे ठेवला. यामुळे, आमच्या जवळपास ४५ लाख ग्राहकांची माहिती आम्हाला थेट मिळू लागली. यामुळे आम्हाला मोठा फायदा झाला आणि कंपनीचं मूल्य जवळपास ४०० दशलक्ष (सुमारे ३ हजार ४०० कोटी रुपये) झालं. आमच्या ब्रँडने तयार केलेली सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सावकारी व्यवसाय. एखाद्या कर्ज देणाऱ्या कंपनीसाठी शून्य व्याजदाराने मनी-लेन्डिंग बिझनेस प्लॅन तयार करणं ही एक मोठी गोष्ट आहे. पण, आमची योजना खूप चांगली वर्कआऊट झाली आणि कंपनीला भरपूर यश मिळालं. दरम्यान, काही दिवसांआधी विवेकने व्यवसाय करणं हा माझा कायम 'प्लॅन बी' होता असं सांगितलं होतं. व्यवसायाचं पाठबळ असल्याने बॉलीवूडच्या लॉबीतून बाहेर पडून सहज त्याकाळी उदरनिर्वाह करणं शक्य झाल्याचंही विवेकने सांगितलं होतं.



## शॉर्ट न्यूज

### चार महिन्यांत १६३ कोटी वसुलीचे आव्हान

**नगर :** गेल्या आठ महिन्यांत जमीन महसूल व गौण खनिज मिळून फक्त ७५ कोटी ८१ लाख रुपयांचा महसूल शासनाच्या तिजोरीत जमा झाला आहे. विधानसभा निवडणुकीच्या कामकाजामुळे महसूल वसुलीकडे दुर्लक्ष झाल्याचे सांगितले जात आहे. महसूल वसुलीचे टार्गेट पूर्ण करण्यासाठी चार महिन्यांत १६३ कोटी रुपये वसूल करण्याचे आव्हान महसूल विभागापुढे उभे राहिले आहे. राज्य शासनाकडून दरवर्षी महसूल विभागाला टार्गेट दिले जात आहे.

### बसस्थानकातून साडेआठ तोळे दागिन्यांची चोरी

**संगमनेर :** बसस्थानकात एसटी बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा उठवून अज्ञात चोरट्याने तब्बल साडेआठ तोळे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ७९ हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवला आहे. सदर घटना सोमवारी (दि. १६) दुपारी सव्वादोन वाजेच्या सुमारास घडली आहे. याबाबत संगमनेर शहर पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की लता शरद घुगे या येथील बसस्थानकातून नाशिक एसटी बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा उठवत दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ७९ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

### ७२ सेवा सोसायटीच्या संचालकांचे पदे रद्द

**शेवगाव :** तालुक्यातील विविध कार्यकारी सोसायटीच्या ७२ संचालकांचे पदे रद्द झाल्यामुळे तालुक्यात राजकीय खळबळ उडाली आहे. तालुक्यातील विविध गावातील विविध विकास सेवा सोसायटीच्या संचालकांची सोसायटीमध्ये थकबाकी असल्याकारणाने त्यांचे पद रद्द करण्याचे आदेश शेवगाव तालुका सहाय्यक निबंधक विजयसिंह लकवाल यांनी दिले आहेत. याबाबत सहाय्यक निबंधक विजयसिंह लकवाल यांनी तालुक्यातील ११८ थकीत संचालकांना ६ सप्टेंबर रोजी थकबाकी संदर्भात नोटीसा बजावण्यात आल्या होत्या.

### डाऊच बुद्रूकमध्ये शॉर्टसर्किटने ऊस पेटला

**कोपरगाव :** तालुक्यातील डाऊच बुद्रूक येथील शेतकऱ्यांचा जवळपास दहा एकर ऊस वीज वितरण कंपनीच्या लोंबकळणाऱ्या तारांच्या घर्षणामुळे जळाला. तलाठी व वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळास भेट देत जळीत उसाचा पंचनामा केला. गेल्या काही महिन्यांपासून वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे ऊस जळीताच्या घटनाघडत असल्याचे चित्र या परिसरात दिसत आहे.

### महिलेस धमकी देत केला आत्याचार

**जामखेड :** इन्स्टाग्रामवर कॉल करून तू माझ्याशी बोल नाहीस तर तुझे कॉल रेकॉर्डिंग व मेसेज मी व्हायरल करेल असे म्हणुन महिलेला ब्लॅकमेल करून तिच्याकडून पैसे उकळले तसेच तू मला भेटली नाही तर तुझे लॉजमध्ये काढलेले अश्लील फोटो व्हायरल करेल अशी धमकी देऊन पीडित महिलेवर अत्याचार केला. या प्रकरणी एकजणा विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विखे पाटील कृषी महाविद्यालयात देश का प्रकृती परिक्षण अभियान

## मानवी प्रकृती विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




**नगर : प्रतिनिधी**

**डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालय, विळदघाट, अहिल्यानगर मध्ये डॉ. गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेदिक महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमानाने कृषी महाविद्यालय विळदघाट मध्ये देश का प्रकृती परिक्षण अभियान राबविण्यात आले. हा कार्यक्रम कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २५ नोव्हेंबर २०२४ रोजी देश का प्रकृती परिक्षण अभियान सुरू केले असून या अभियानासंदर्भात दि. १७ डिसेंबर २०२४ रोजी कृषी महाविद्यालयात १८ पेक्षा जास्त वय असलेल्या विद्यार्थ्यांचे व कर्मचाऱ्यांचे प्रकृती परिक्षण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे होते. तसेच गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. ए. टी. देशमुख, सहयोगी प्राध्यापक स्वास्थ्यवृत्त विभाग प्रमुख तसेच डॉ. यु. व्ही. सलगरे (पाटील), रचना शारीरिक विभाग प्रमुख, कृषी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. बी. राऊत, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. के. एस. दांगडे, डॉ. एम. एस. अनारसे, डॉ. डी. एम. नलावडे, प्रा. एस. बी. डमाळ उपस्थित होते.

यावेळी डॉ. ए. टी. देशमुख यांनी मानवी प्रकृती विषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच डॉ. यु. व्ही. सलगरे यांनी प्रकृती परिक्षण ॲप विषयी माहिती दिली व डाऊनलोड झालेल्या ॲपचे आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांद्वारे प्रकृती परिक्षण पूर्ण करण्यात आले. यावेळी डॉ. मधुकर धोंडे यांनी महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी या अभियानात सहभागी होवून आपल्या प्रकृतीचे परिक्षण करून घ्यावे असे आवाहन केले आणि योग्य ते मार्गदर्शन करून अभियानास शुभेच्छा दिल्या. या अभियानासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एम. एस. अनारसे यांनी केले.

# गायीला राज्यमाता दर्जा मिळाला; पण गोसेवकांचा तुटवडा:अनुदानही मिळेना!

## निर्णय झाल्यानंतर दोन महिन्यांनी संकेतस्थळ केले सुरू



**मुंबई : प्रतिनिधी**

**देशी गायींचे संगोपन, संवर्धन आणि पालनपोषण करण्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य शासनाने देशी गायीला राज्यमाता गोमातेचा दर्जा दिला आहे. या निर्णयामुळे देशी गायींची संख्या वाढण्याचे प्रयत्न होणार आहेत. मात्र गायींच्या देखभालीसाठी गोसेवक मिळत नसल्याची चिंता गोशाळांना सतावत आहे. तसेच देशी गायींच्या पालनपोषणासाठी शासनाने प्रतिगाय दररोज ५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.मात्र दोन महिने होऊनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही.**

राज्यात सुमारे १३ लाख देशी गायींची संख्या आहे, तर ८५० च्या आसपास गोशाळा आहेत. गेल्या काही वर्षांत देशी गायींची संख्या घटल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे राज्य शासनाने हा निर्णय घेतला आहे. राज्याच्या वेगवेगळ्या भागात विविध देशी जातींच्या गायी आढळतात. मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी, पश्चिम महाराष्ट्रामध्ये खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ अशा जाती आहेत. हिंदू धर्मात गायीला विशेष स्थान आहे. धार्मिक विधीमध्ये तिची पूजा केली जाते. गोमूत्र आणि शेण पवित्र मानले जाते. तसेच विविध धार्मिक समारंभात वापरले जाते. सेंद्रिय शेतीमध्ये गाय महत्त्वाची मानली जाते. गोमूत्राचा वापर शेतीमध्ये केला जातो, जो पिकांसाठी फायदेशीर असतो. राज्य शासनाने देशी गायींना गोमातेचा दर्जा दिल्यानंतर गोशाळेत देशी गायींची संख्या वाढण्यास सुरुवात झाली आहे.

मात्र गोमातेची सेवा करणाऱ्या गोसेवकांची कमतरता भासू लागली आहे. त्यामुळे राज्य शासनाने गोसेवकांची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे. देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रतिदिन प्रतिगाय ५० रूपये अनुदान देण्याची घोषणाही सरकारने केली आहे. एका गोशाळेत किमान ५० गोवंश असणे आवश्यक आहे. गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था अनुदानासाठी पात्र ठरणार आहेत. मात्र गोसेवक नसल्याने गायी सांभाळायच्या किंवा वाढवायच्या कशा, असा प्रश्न आहे. दरम्यान, राज्यातील गोवंशाचे संवर्धन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या www.mahagosevaayog.org या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण नागपुरात करण्यात आले.

जानेवारीत अनुदान, मजूर मनरेगातून देण्याचा प्रयत्न

राज्यात १३ लाख देशी गायी व ८५० गोशाळा आहेत. गोसेवक मिळत नसल्याच्या त्यांच्या तक्रारी आहेत. शेणाची कामे कुणी करीत नाही. त्यामुळे गोशाळांना आयोगाकडून मनरेगातून मजूर देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. राज्य शासनाकडून अनुदान देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. जानेवारीमध्ये ते मिळू शकेल. तसेच गोरक्षकांचा विमा काढण्यात येणार आहे.

उद्धव नेरकर, गोसेवा आयोग सदस्य

परप्रांतीय मजुरांवर अवलंबून राहावे लागते

आमच्याकडे १०० देशी गायी आहेत. शेण-गोमूत्र गोळा करणे आदी कष्टाची कामे करावी लागतात. त्यासाठी स्थानिक सेवक मिळत नाहीत. त्यामुळे उत्तर प्रदेश आणि बिहारमधील मजुरांवर अवलंबून राहावे लागते. हे मजूर प्रशिक्षित नसतात. त्यांना दरमहा १५ ते २० हजार रुपये वेतन द्यावे लागते. त्यामुळे गोसेवक मिळत नसल्याची मोठी अडचण भासते.

विजय जाधव, गोशाळा मुरबाड

# समनापूर येथे अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक व्हावे

## आमदार सत्यजित तांबे यांची विधानपरिषदेत मागणी

**नागपूर : प्रतिनिधी**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ह्या तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जात आहेत. संगमनेर तालुक्यातील विविध गावांशी त्यांचा त्या काळात मोठा संबंध आला असून त्यांच्या कार्याची ओळख पुढील पिढ्यांना सदैव प्रेरणादायी राहावी, याकरता समनापूर येथे त्यांच्या भव्य स्मारकासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा, अशी आग्रही मागणी आमदार सत्यजित तांबे यांनी विधानपरिषदेत केली आहे.**




नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात विधानपरिषदेत बोलताना नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुका हा सततच्या विकास कामातून वैभवशाली बनवला आहे. या तालुक्याला मोठा ऐतिहासिक वारसा असून तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळख असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा संगमनेर तालुक्यातील अनेक गावांशी त्या काळात संबंध आला आहे.

समनापूर या ठिकाणी त्यांच्या काळातील ऐतिहासिक बाराव असून ही बारवाची जागा लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातून मी सातत्याने पाठपुरावा करून महाराष्ट्र शासनाच्या नावे करून घेतली आहे. त्यांच्या कार्यकाळात तालुक्यातील विविध गावांमध्ये त्यांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी, यासाठी बारव निर्माण केल्या आहेत. आजही त्या बारव सुस्थितीत असून आजच्या पिढीला त्यांच्या महान कार्याची ओळख करून देण्यासाठी आणि या ऐतिहासिक ठिकाणांचे संवर्धन व जतन करण्यासाठी समनापूर या गावांमध्ये त्यांचे भव्य स्मारक व्हावे, अशी सर्वांची मागणी आहे.

तरी समनापूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारक होण्यासाठी विशेष बाब म्हणून जिल्हा नियोजन अथवा कोणत्याही उचित निधीतून एक कोटी रुपयांचा निधी प्रस्थापित करावा व तातडीने हे भव्य स्मारक निर्माण करावी, अशी आग्रही मागणी सत्यजित तांबे यांनी केली आहे.आमदार सत्यजित तांबे यांनी विधान परिषदेत पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांचे समनापुरमध्ये स्मारक होण्यासाठी केलेल्या मागणीचे समनापूर ग्रामस्थ व तालुक्यातील सर्व नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेरच्या हायटेक बसस्थानका समोरील दर्शनी भागामध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सध्या असलेल्या पुतळ्याच्या जागेवर त्यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार असल्याची माहितीही आमदार सत्यजित तांबे यांनी दिली आहे.

**वाचकांच्या लेखणीतून**

# दस्तार जिन्हें दी है उन्हें सर भी अता कर




निंदक नियरे राखिए, आंगन
कुटी छवाय।
बिन पानी, साबुन बिना,
निर्मल करे सुभाय।।
-संत कबीर

संत कबीर म्हणतात, जो आपली निंदा करतो, तो आपण शेजारी म्हणून ठेवला पाहिजे. तो आपल्यातल्या कमतरता साबुणपाण्याविना दूर करतो आणि आपला स्वभाव निर्मळ करतो.

असेच एक निंदक माझ्या शेजाराला आले होते. पण असे बिनडोक निंदक काय कामाचे?

त्यावेळी मी नव्या मुंबईला राष्ट्रीकृत बँकेच्या मुख्यालयात क्लार्क म्हणून काम करीत होतो. तेथे आमच्या विभागात एक अधिकारी होते. मराठीच होते. ते माझा नेहमी अपमान करीत असत. माझ्यावर जळत असत. त्याचे कारण मला कळले नाही. मी युनियनच्या प्रतिनिधी होतो. शिवाय एक लेखक आणि कवीही. मराठीतला आणि हिंदीतलाही. या महोदयांना यातले काय देखवले नसावे?

माझ्याकडून तरी काही आगळिक घडल्याचे मला आठवत नाही. पण हे त्या अधिकाऱ्याला शोभत नव्हते, एवढे खरे. बाकी या महोदयांचे अक्षर फार सुंदर होते. मला ते आवडायचे. सिंहाला सुंदर आयाळ लाभली तरी त्याच्यातला क्रूरपणा काही जात नाही! असले कसले हे निंदक?

मी एकदा पाहिले, दोनदा पाहिले आणि तिसऱ्यांदाही पाहिले आणि कार्यालयातल्या एका त्रयस्थ व्यक्तीसमोर या महोदयांना एक उर्दू शेर सुनावला. क़तील शिफाई या पाकिस्तानी शायराचा होता तो. फार मार्मिक आणि सटीक होता तो उर्दू शेर!

शरमिंदा उन्हें, ऐ ख़ुदा, इतना कर।
दस्तार जिन्हें दी है उन्हें सर भी अता कर।।

हे ईश्वरा, ज्यांना तू मानाची पगडी दिली आहेस त्यांना डोकेही दिले असतेस तर त्यांच्या डोक्यात प्रकाश पडून ते शरमिंदा झाले असते!

शेर सुनवून मी त्या अधिकाऱ्याने शेराला दाद द्यावी म्हणून त्यांचा हात पकडला आणि म्हणालो होय की नाही? ते महोदयही उत्तरले, होय होय. कदाचित त्या शेराचा अर्थही त्यांना उमगला नसावा. पण ते थोडेबहुत उर्दू जाणीत होते, एवढे खरे. घरी गेल्यावर त्यांनी अर्थ जाणून घेतलाच असावा!

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### आयकर विवरणपत्र सादर करण्यासाठी सवलत मिळावी

आर्थिक वर्ष २०१७-१८ ते २०२३-२४ या कालावधीमध्ये सोसायट्यांना नफा झाला आहे. त्या सोसायट्यांनी नफयाच्या रकमेवर ३० टक्के कर व त्यावर दंड तसेच व्याज या रकमा भराव्या लागतील असे सांगण्यात आले. सहकारी संस्था या करमुक्त आहेत. सेक्शन ८० पी नुसार सहकारी संस्थेस इन्कम टॅक्समधून वजावट मिळते. परंतू सेक्शन १३०,१ नुसार मुदतीत आयकर विवरण पत्र न भरल्यामुळे सेक्शन ८० एसी नुसार चॅप्टर व्हीआयए मधील सेक्शन ८० पी नुसार वजावट मिळू शकत नाही. हा सेक्शन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून लागू झालेला आहे. बहुतांशी सोसायट्या ग्रामीण भागातील असल्याने व त्याचे सर्व सभासद हे शेतकरी असल्याने त्यांना व संस्थेचे कर्मचारी, संचालक मंडळ यांना आयकराविषयी ज्ञान नसल्याने संबंधित काळातील आयकर विवरण पत्रे भरणे राहून गेले आहे. त्यामुळे विवरणपत्रे सादर करण्यास सवलत देण्यात येउन दंडात्मक कारवाई करू नये अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. विविध कार्यकारी सेवा संस्था कोणतेही व्यवसायीक कामकाज करत नाही. प्रामुख्याने डिमांड ड्राफट, चेक बुक किंवा लॉकर आदी सुविधा सभासदांना पुरवत नाही. सोसायटया या जिल्हा बँकेकडून कर्ज घेऊन सभासदांना कर्ज वितरीत करतात. शेतकरी सभासदांकडून कर्जाची वसुली करण्याचे काम सोसायटी करते. त्या व्यतिरिक्त कोणतेही संस्थेचे कामकाज नसते. संस्थेचे कर्मचारी कर्जाची वसुली करतात व त्यांची नोंद वसुली रजिष्टरमध्ये करतात. तीच रक्कम जिल्हा बँकेत भरणा केली जाते. असे असतानाही बऱ्याच सोसायटयांना आयकर विभागाकडून सेक्शन ६९ प्रमाणे नोटीस आलेल्या आहेत. वास्तविक हे संस्थेचे उत्पन्न नसून कर्जाची वसुल झालेली रक्कम असल्याचे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

### विधान परिषदेच्या सभापतीपदी राम शिंदेंची निवड निश्चित

देण्याची भूमिका घेतली. दरम्यान् लोकशाहीमध्ये विरोधकाला सुद्धा अपेक्षा असते की सभापतीने आपलं सुद्धा म्हणणं ऐकलं पाहिजे. बिनविरोध सभापतीपदाची नेमणूक होणं हे लोकशाहीसाठी चांगलं असल्याचे मत भाजप नेते राम शिंदे यांनी व्यक्त केलं. अधिकृत रित्या माझी उद्या राज्यपालांच्या संदेशानुसार विधानपरिषदेच्या सभापतीपदी निवड होईल असे राम शिंदे म्हणाले.

# शिवपानंद शेत रस्ते खुले करण्याचे आदेश देऊ

## विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांची ग्वाही

पारनेर : प्रतिनिधी

**शिवपानंद शेत रस्ते खुले करण्यासंदर्भात जिल्हा तसेच तालुका प्रशासनास आदेश देण्यात येतील अशी ग्वाही नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेत रस्ता चळवळीच्या शिष्टमंडळास दिले.**

शाळकरी विद्यार्थी, शेत रस्ते पिडीत शेतकऱ्यांच्या दळवळवळणाचा प्रश्न गांभीर्याने घ्यावा अशी मागणी करत चळवळीच्या वतीने विभागीय आयुक्तांना निवेदन देण्यात आले. त्यावेळी प्रवीण गेडाम यांनी सकारात्मक भुमिका घेऊन जिल्हा व तालुका प्रशासनास आदेश देण्याची ग्वाही दिली.

महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेत रस्ता चळवळीच्या वतीने शेतकऱ्यांच्या पिढ्यान् पिढया सुरू असलेल्या शेत रस्त्यांच्या प्रश्नावर राज्यव्यापी प्रशासकीय लढा, जनजागृती, जनआंदोलन करीत राज्य सरकारचे लक्ष वेधण्यात येत आहे. राज्यातील तहसिल कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये निवेदने देण्यात येऊन आंदोलनेही करण्यात आली आहेत.

ग्रामीण भागातील गावागावातील वाडी वस्तीवरील शाळकरी विद्यार्थी, अपंग, शेतरस्ते पिडीत शेतकरी यांचा शेत रस्त्यांअभावी सुरू असलेला जीवघेणा प्रवास थांबावा यासाठी शास निर्णयाची अंमलबजावणी व्हावी, उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन व्हावे, तातडीने ग्रामशेत रस्ता समित्या स्थापन करून गावागावातील निर्माण होणारे रस्त्यांचे वाद गावपातळीवर समुपदेशन करून सामोपराचाने मिटवावेत, शेतरस्त्यांच्या प्रकरणावरून होणारे वाद शेतकऱ्यांच्या बैठका घेउन सोडवावेत, वाद न मिटल्यास तहसिलदारांकडे दाद मागावी, शेतकऱ्यांसाठी नवीन रस्त्याची मागणी असेल तर महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १०३अन्वये तहलिदारांकडे मागणी करणे, समितीच्या बैठका घेऊन त्याचे अभिलेख तयार करणे असे असूनही समित्या गठीत नसल्याने अनेक शेतकऱ्यांची शेती पडीक असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

शिष्टमंडळात शिवपानंद शेत रस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले, सचिन शेळके, भाउसाहेब वाळुंज, संजय साबळे यांचा समावेश होता.



शिवपानंद शेत रस्ते खुले करण्यासंदर्भात शिवपानंद शेत रस्ता चळवळीच्या वतीने विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांना निवेदन सादर करण्यात आले.

### काय आहेत मागण्या ?

**शिवपानंद शेतरस्त्यांच्या हददी निश्चित व्हाव्यात, वहिवाटेच्या रस्त्यांचे सर्वेक्षण होऊन त्याची नोंद गाव नकाशावर करण्यात यावी, तहसिलदार कार्यालयात शेत रस्ता प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात यावीत, नकाशावरील सर्व शेतरस्त्यांना नंबरी लाउन नंबरी हटविणारांवर दंडात्मक कारवाई करावी, नंबरीचे सर्वेक्षण सुरु करावे आदी मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत.**

### जमीनी गमावण्याची वेळ

**शेतात बांधावरून शेतीपुरक औजारे, यंत्रसामुग्री घेऊन जाण्यासाठी, शेतात पिकविलेला शेतमाल डोक्यावरून घेऊन जाणे, शेतमाल बाजारात घेऊन जाता न येणे यामुळे शेतक-यांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. त्यातून वाद, भांडणे, हाणामाऱ्या, कोर्ट कचेऱ्या हे प्रकार सर्रास घडत आहेत. सततच्या त्रासाला कंटाळून अनेक शेतकऱ्यांनी आपल्या जमीनही गमावल्या आहेत.**

### प्रकरणे निकाली काढा

**तहसिल कार्यालयातील प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढा, शिव पानंद रस्त्यांसाठी भुमि अभिलेख कार्यालयाने मोजणी शुल्क आकारू नये., पोलीस प्रशासनाने संरक्षण शुल्क आकारू नये, महसूल, भुमि अभिलेख कार्यालयांमध्ये अपुऱ्या मनुष्यबळाची संख्या वाढवून शेतरस्ते खुले करताना होणारी दिरंगाई थांबवावी, ग्रामशेतरस्ता समित्या स्थापनेचे तातडीने आदेश देण्यात यावेत, शासन निर्णयाची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांचा श्वास खुला करावा अशा मागण्याचीही निवेदनात करण्यात आल्या आहेत.**

# मदतीचा हात देत भाईक कुटूंबाने जपली बांधिलकी

## बारकूशेठ भाईक यांच्या जपल्या स्मृती

काटाळवेढे : प्रतिनिधी

**शाळा, देवस्थान तसेच सामाजिक कामांसाठी देणगी देत काटाळवेढे येथील भाईक कुटूंबाने सामाजिक बांधिलकी जोपासली. माजी सरपंच कै. बारकूशेठ भाईक यांच्या स्मृती जपण्यासाठी भाईक कुटूंबाने दिलेल्या योगदानाचे परिसरात कौतुक होत आहे. काटाळवेढे ग्रामपंचायतचे माजी सरपंच बारकूशेठ भाईक यांचे अलिकडेच निधन झाले. त्यांच्या दशक्रियाविधीप्रसंगी त्यांच्या कुटूंबियांनी विविध कामांसाठी देणगी दिली.**



मा. सरपंच बारकूशेठ भाईक यांचा परिवार, नातेवाईक तसेच मित्र परिवाराने बाजी फाउंडेशनची स्थापना केली आहे. सरपंचपद भुषविताना बारकूशेठ भाईक यांनी तालुका पातळीवरील नेते मंडळी तसेच ग्रामस्थांच्या सहकार्यातून मोठया प्रमाणावर विकास कामे माग लावली. राजकीय क्षेत्रात काम करताना त्यांनी सामाजिक भवनेतून काम करत सामाजिक कामांना चालना दिली. धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात त्यांनी मोठया प्रमाणात योगदान दिले.

राजकीय, सामाजिक कामात योगदान देताना त्यांनी परिवाराकडेही लक्ष दिले. त्यामुळेच आज त्यांचा परिवार सुशिक्षित आहे. शिक्षक, डॉक्टर तसेच नामांकित कंपन्यांमध्ये या कुटूंबातील सदस्य नोकरीत आहेत. सामाजिक क्षेत्रात काम करताना खंडूशेठ भाईक यांनी सर्वसामान्य जनतेला पाठबळ दिले असून त्यांचे कायमस्वरूपी स्मरण रहावे यासाठी बाजी फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही सामाजिक कार्यात अग्रभागी राहू अशी ग्वाही फाउंडेशनच्या सदस्यांनी दिली.

### मदतीचा तपशिल

**बाजी फाउंडेशनच्या वतीने शाळेचे प्रवेशदवार, गावाची स्मशानभुमी, दशक्रीया विधी प्रवचन ओटा बांधण्यात येणार असून पळसपुर येथील आदर्श विद्यालयास पाच हजार, काताळवेढा जिल्हा परिषद शाळेसाठी पाच हजार, डोंगरवाडी जिल्हा परिषद शाळेसाठी एक हजार, नळवणे येथील खंडेश्वर देवस्थानसाठी एक हजार, नळावणे येथील दत्त मंदीरासाठी एक हजार, दत्त देवस्थानसाठी एक हजार रूपयांची देणगी तसेच अनाथालयासाठी किराणा देण्यात येणार आहे.**

# जेऊर येथील कत्तलखान्यावर छापा

जेऊर बायजाबाई : प्रतिनिधी

**नगर तालुक्यातील जेऊर (बायजाबाई) येथील कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून तब्बल ६ लाख २० हजारांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात ९ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

इकलास मुनाफ शेख, रा.जेऊर, ता.अहिल्यानगर, असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याकडे चौकशी केली असता मुनाफ रफीक शेख, सोनू रफीक शेख, मुनाफ चाँद शेख, आयाज शब्बीर कुरेशी, फैयाज शब्बीर कुरेशी, समीर निसार कुरेशी (सर्व रा. जेऊर, ता. अहिल्यानगर), असे गुन्हा दाखल झालेल्या फरार संशयित आरोपींची नावे आहेत. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# पोस्को गुन्ह्यातील आरोपीस २० वर्षे तुरुंगवास

## रांजणगाव एमआयडीसी हद्दीतील घटना

शिरुर : प्रतिनिधी



**रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पिडीत अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरुन बलात्काराचा गुन्हा दाखल असलेल्या आरोपीला पुणे सत्र न्यायालयाने २० वर्षे सश्रम कारावासाची व पन्नास हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. महेश श्रीहरी लटपटे (वय २४) असे या आरोपीचे नांव आहे.**

याबाबत रांजणगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सदर गुन्हयातील आरोपी महेश श्रीहरी लटपटे (वय २४) मुळ रा. लाडेवडगाव, ता. केज, जि.बीड याच्याविरुध्द गुन्ह्याचे तपासी अधिकारी दौंड विभागाचे (तत्कालीन) उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल धस यांनी सखोल तपास करून विशेष न्यायालय, जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे कोर्टात पुराव्यासह दोषारोपपत्र दाखल केले होते.

सदर केसची सुनावणी चालु असतांना आरोपीने जामीनासाठी मुंबई उच्च न्यायालय यांच्या कोर्टात अर्ज दाखल केला असता कोर्टाने सदरचा अर्ज रद्द केल्याने आरोपीने जामीनासाठी दिल्ली सुप्रिम कोर्टात अर्ज दाखल केला होता. त्यावेळी शिरुर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांनी त्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करत वेळोवेळी सदर केसमध्ये पाठपुरावा केल्याने सदर आरोपीचा जामीन अर्ज रद्द झाला होता.

तसेच सदर केसच्या सुनावणी दरम्यान गुन्ह्यातील साक्षीदार यांना रांजणगाव एम आय डी सी पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी साक्षीदार यांना वेळेत कोर्टात हजर ठेवुन पाठपुरावा केला होता. साक्षी पुराव्याचे आधारे पुणे सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस आर नरवडे यांनी दि १७ डिसेंबर रोजी आरोपी महेश श्रीहरी लटपटे याला २० वर्षे सश्रम कारावासाची तसेच ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

सदर केसमध्ये सरकारी वकील ॲड. भारती कदम, केस अधिकारी पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे, कोर्ट पैरवी अंमलदार पोलिस हवालदार आप्पासाहेब सुर्यवंशी, पुणे सेशन कोर्ट पैरवी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक विद्याधर निचीत, जिल्हा कोर्ट पैरवी अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांनी काम पाहिले आहे.

# एका बातमीमुळे समाजात मोठे परिवर्तन घडते

## विकास पत्रकारिता गरजेची । प्रभारी उपसंचालक तथा जिल्हा माहिती अधिकारी किरण मोघे यांचे प्रतिपादन

नगर : प्रतिनिधी

**पत्रकारांना लेखणीमुळे सन्मान मिळतो. पत्रकारांना सकस पत्रकारिता करता यावी यासाठी शासन पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ देते. पत्रकारांच्या एका बातमीने समाजात मोठे परिवर्तन घडते. त्यामुळे विकास पत्रकारिता आवश्यक आहे. असे प्रतिपादन शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नाशिक विभागाचे प्रभारी उपसंचालक तथा जिल्हा माहिती अधिकारी डॉ. किरण मोघे यांनी केले.**



नाशिक विभागीय अधिस्वीकृती समिती, जिल्हा माहिती कार्यालय आणि सीएसआरडी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी सीएसआरडी संस्थेच्या सभागृहात विकास पत्रकारिता व पत्रकारांसाठीच्या विविध शासकीय योजना या विषयावर कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार रामदास ढमाले हे होते. कार्यशाळेला राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रकाश कुलथे, नाशिक विभाग अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष सुधीर लंके, नाशिक विभाग अधिस्वीकृती समितीचे सदस्य विजयसिंह होलम, सीएसआरडीचे प्रा. विजय संसारे यांची उपस्थिती होती. कार्यशाळेत ज्येष्ठ पत्रकार, मुक्त पत्रकार, विविध दैनिकांचे संपादक, पत्रकार, वृत्तछायाचित्रकार, पत्रकारिता महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

डॉ. मोघे म्हणाले, पत्रकारांसाठी पत्रकार सन्मान निधी योजना आहे. तसेच शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधीतून पत्रकारांना आजारपणात मदत केली जाते. विकासात्मक पत्रकारितेसाठी शासनाचे विविध पुरस्कार आहेत. केंद्र सरकारचीही पत्रकारांना मदत करणारी योजना आहे. याबाबत पत्रकारांनी सतर्क राहून योजनांचा फायदा घेणे आवश्यक आहे. लंके म्हणाले, अधिस्वीकृती व इतर योजनांची माहिती सर्व पत्रकारांना मिळावी यासाठी समिती जिल्हानिहाय कार्यशाळा घेत आहे.पत्रकारितेचा दर्जा उंचावणे व पत्रकारांच्या पाठिशी मदत उभी करणे हा समितीचा हेतू आहे.

ढमाले म्हणाले, अधिस्वीकृती प्राप्त होण्यासाठी सध्याच्या नियमांमध्ये काही बदल करण्याची गरज आहे. कार्यशाळेचा उपक्रम स्तुत्य आहे. कुलथे म्हणाले, अधिस्वीकृती समिती ही पत्रकारांच्या नेहमीच पाठीशी आहे. विजयसिंह होलम यांनी प्रास्ताविक करत कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला.अनेक पत्रकारांना योजनाच माहिती नसतात. त्यामुळे योजना पत्रकारांपर्यंत पोहोचवणे हा कार्यशाळेचा उद्देश असल्याचे ते म्हणाले.

सूत्रसंचालन प्रा. सॅम्युअल वाघमारे यांनी, तर आभार पत्रकार भैरवनाथ वाकळे यांनी मानले. विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कार्याबद्दल डॉ. मोघे यांचा सत्कार जिल्हा माहिती अधिकारी डॉ. किरण मोघे यांनी विधानसभा निवडणूक काळात पुस्तिका निर्माण करुन पत्रकारांपर्यंत जुनी राजकीय माहिती पोहोचवली याबाबत मन्सूर शेख, विठ्ठल लांडगे, भूषण देशमुख, महेश देशपांडे, मिलिंद देखणे, सूर्यकांत नेटके, बंडू पवार, निशांत दातीर, कुणाल जायकर, रोहित वाळके, विठ्ठल शिंदे आदींच्या हस्ते जिल्ह्यातील पत्रकारांच्या वतीने मोघे यांचा सत्कार करण्यात आला.

# शिधापत्रिका प्रणाली राबविण्यास चालढकल!

## ई सेवा केंद्र चालक वैतागले । तहसिलदार गायत्री सैंदाणे यांना निवेदन

सुपा : प्रतिनिधी

**संपूर्ण राज्यात तसेच शेजारच्या तालुक्यांमध्ये ऑनलाईन शिधापत्रिका प्रणाली सुरळीत सुरू असताना फक्त पारनेर तालुक्यात ऑनलाईन पध्दती राबविण्यात अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून चालढकल होत असल्याने तालुक्यातील महा ई सेवा केंद्र चालक वैतगाले असून त्यांनी त्यासंदर्भात तहसिलदार गायत्री सैंदाणे यांच्याकडे तक्रार केली आहे.**

रेशकार्डमधून ऑनलाईन नाव कमी करणे, नावाचा समावेश करणे, नवीन रेशन कार्ड देणे ही कामे करताना अधिकाऱ्यांकडून, कर्मचाऱ्यांकडून जाणीवपुर्वक दिरंगाई करण्यात येते, टाळाटाळ करण्यात येते. खाजगी एजंटमार्फत आलेल्या कामांना सबंधित अधिकारी प्राधान्य देत असल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य महा ई सेवा केंद्र व आधार केंद्र संघटनेच्या तालुका संघटनेच्या वतीने हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी संघटनेचे तालुका प्रतिनिधी पुरूषोत्तम सोमवंशी, राजेंद्र ढवळे, सचिन काळे, अश्पाक मोमीन, संदीप अडसूळ, संतोष ठुबे, विनायक झावरे, ज्ञानेश्वर चौधरी आदी उपस्थित होते.





### ५० टक्के नागरीक धान्यापासून वंचित !

**गेल्या चार वर्षांपासून एइपीडीएस ऑनलाईन प्रणालीमार्फत अन्नधान्य मिळण्यासाठी अनेक नागरिकांनी स्वस्त धान्य दुकानदारामार्फत अर्ज सादर केले असून त्यातील तब्बल ५० टक्के अर्जदार संबंधित अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे अन्नधान्य मिळण्यापासून वंचित असल्याची धक्कादायक माहीतीही या तक्रारीतून पुढे आली आहे.**

### अनधिकृत केंद्रांना आळा घाला

**पारनेर तालुक्यात आपले सरकार सेवा केंद्र ज्या ठिकाणी मंजर आहे, व ज्या व्यक्तिला हे केंद्र मंजुर आहे, ती व्यक्ति ते केंद्र न चालविता दुसरी व्यक्ति ते केंद्र चालवित आहे. अशा केंद्रावर तहसिलदारांनी कारवाई करावी अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली असून तसे झाले तर त्याचा प्रशासनास फायदा होईल. कारण अशा व्यक्तिंकडून होत असलेली बोगस व अनधिकृत कामे थांबण्यास मदत होणार आहे.**

# श्रीराम कामगार संघटनेचे उपायुक्तांना निवेदन

## बांधकाम कामगारांची प्रकरणे मंजूर करावीत

श्रीरामपूर : प्रतिनिधी

**श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघातील बांधकाम कामगारांची नव्याने नावनोंदणी, नोंदीत कामगारांचे नूतनीकरण, शिष्यवृत्ती, प्रसूती, भांडे संच आदी प्रकरणे गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित असून, ही प्रकरणे तात्काळ मंजूर करण्याची मागणी नगरचे कामगार उपायुक्त रेवणनाथ धिसले यांच्याकडे श्रीराम संघटीत बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे केली आहे.**



श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघातील बांधकाम कामगारांचे नूतनीकरणाचे काम अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे. त्यामुळे रेशनकार्ड, शिष्यवृत्ती, महिलांचे प्रसूती अनुदान, भांड्यांचा संच वितरणाची कामे रखडली आहे. त्यामुळे बांधकाम कामगारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच नवीन नोंदणी बंद असल्याने अनेक कामगार या योजनेपासून वंचित राहत आहेत. सदर प्रकरणे तात्काळ चालू करण्याची मागणी नीरज मुरकुटे, संघटनेचे संस्थापक गणेश छल्लारे, अध्यक्ष संदीप शेरमाळे, सागर अमोलिक, संदीप कांबळे यांनी केली आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com